RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक ४९] सोमवार, ऑगस्ट १३, २०१८/श्रावण २२, शके १९४० [पृष्ठे ८, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ८७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४.—** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . . . . . . | १-८ |


दिनांक ८ ऑगस्ट २०१८ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १३ ऑगस्ट २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

२०१७ चा महा. अध्या. १६. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अध्यादेश" असा करण्यात आला आहे) हा दिनांक १९ जुलै २०१७ रोजी प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २४ जुलै २०१७ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७ (सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त विधेयक" असा करण्यात आला आहे) हे, महाराष्ट्र विधानसभेत दिनांक १० ऑगस्ट २०१७ रोजी मांडण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेची दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानसभेत उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, दिनांक ३ सप्टेंबर २०१७ रोजी उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटले होते; आणि, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी १ सप्टेंबर २०१७ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "पुढे चालू ठेवणे अध्यादेश" असा करण्यात आला आहे) हा प्रख्यापित केला होता ; २०१७ चा महा. अध्या. १८.

**आणि ज्याअर्थी,** दिनांक ११ डिसेंबर २०१७ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त विधेयक हे, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी सुधारणासह संमत केले होते आणि ते महाराष्ट्र विधानपरिषदेकडे पारेषित करण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त विधेयकहे महाराष्ट्र विधानपरिषदेने दिनांक २२ डिसेंबर २०१७ रोजी आणखी सुधारणेसह संमत केले होते ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र विधानपरिषदेने उक्त विधेयकात केलेल्या सुधारणा, महाराष्ट्र विधानसभेने विचारात घेण्यापूर्वीच, विधानसभेच्या अधिवेशनाची दिनांक २२ डिसेंबर २०१७ रोजी सत्र समाप्ती झाली ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त पुढे चालू ठेवणे अध्यादेश राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर म्हणजेच दिनांक २१ जानेवारी २०१८ नंतर अंमलात असण्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, पुढे चालू ठेवणे अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २० जानेवारी २०१८ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१८ (यात यापुढे ज्याचा निर्देश "पुढे चालू ठेवणे अध्यादेश, २०१८" असा करण्यात आला आहे) हा प्रख्यापित केला होता ; २०१८ चा महा. अध्या. २.

**आणि ज्याअर्थी,** उक्त पुढे चालू ठेवणे अध्यादेश, २०१८ याचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, २०१७ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १९ जुलै २०१७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये,— १९५९ चा ३.

(क) खंड (११अअ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(११अअअ) "सदस्य" याचा अर्थ कलम ११ अन्वये पंचायतीचा सदस्य म्हणून यथोचितरीत्या निवडून आलेला पंचायत सदस्य, असा आहे आणि त्यात कलम ३०अ-१अ अन्वये पंचायतीत थेट निवडून आलेल्या सरपंचाचा अंतर्भाव होतो ;" ;

(ख) खंड (१७) मध्ये "कलम ३०" या मजकुरानंतर, ", ३०अ-१अ" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३अ) ज्या पंचायतीचा सरपंच कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतींच्या संबंधात, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली नसेल तर, पंचायतीच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या होणाऱ्या सर्व ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच असेल आणि त्याच्या अनुपस्थितीत उप-सरपंच अध्यक्षस्थानी असेल ; आणि सरपंच व उप-सरपंच या दोघांच्या अनुपस्थितीत, ग्रामसभेच्या त्या सभेत उपस्थित असलेला, वयाने सर्वात ज्येष्ठ असणारा पंचायतीचा सदस्य अध्यक्षस्थानी असेल. पंचायतीचा कोणताही सदस्य उपस्थित

नसेल त्याबाबतीत, ती ग्रामसभा एक आठवड्याच्या कालावधीसाठी तहकूब करण्यात येईल, आणि अशा तहकुबीनंतर पुन्हा भरविण्यात आलेल्या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच असेल आणि त्याच्या अनुपस्थितीत उप-सरपंच अध्यक्षस्थानी असेल ; आणि सरपंच व उप-सरपंच या दोघांच्या अनुपस्थितीत, ग्रामसभेच्या त्या सभेत उपस्थित असलेला, वयाने सर्वात ज्येष्ठ असणारा पंचायतीचा सदस्य अध्यक्षस्थानी असेल. अशा सभेत पंचायतीचा कोणताही सदस्य उपस्थित नसेल तर गट विकास अधिकाऱ्याने त्याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी अध्यक्षस्थानी असेल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १० ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून आलेला असेल अशा पंचायतींच्या संबंधात, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील, पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये, उप-खंड (एक) च्या पूर्वी, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(एक-अ) कलम ३०अ-१अ अन्वये निवडून आलेला सरपंच — पदसिद्ध सदस्य ; आणि ;". ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलमे (१) व (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

"(१) मतदार यादीत नाव असलेली प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली निरर्ह ठरलेली नसेल तर, अशी यादी ज्या प्रभागासंबंधित असेल त्या प्रभागाच्या सदस्यांच्या, आणि थेट सरपंच निवडून द्यावयाच्या पंचायतीच्या सरपंचाच्या निवडणुकीत मतदान करण्यास अर्ह असेल.

(२) प्रत्येक सार्वजनिक निवडणुकीकरिता किंवा पोट-निवडणुकीकरिता नामनिर्देशित करण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकास मतदार यादीत नाव असलेली आणि २१ वर्षांहून कमी वय नसलेली प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली निरर्ह ठरलेली नसेल तर, त्या गावाच्या कोणत्याही प्रभागासाठी आणि पंचायतीच्या सरपंच पदासाठी म्हणून निवडून येण्यास अर्ह असेल. अशा गावाच्या मतदार यादीत जिचे नाव नोंदविण्यात आले नसेल अशी कोणतीही व्यक्ती त्या गावाच्या कोणत्याही प्रभागासाठी आणि पंचायतीच्या सरपंच पदाकरिता निवडून येण्यास अर्ह असणार नाही.

(२अ) प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीकरिता किंवा पोट-निवडणुकीकरिता नामनिर्देशन करण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकास, २१ वर्षांहून कमी वयाची नसेल, आणि जिचे मतदारांच्या यादीत नाव असेल, आणि जी १ जानेवारी १९९५ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेली असेल आणि जिला या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली निरर्ह ठरवलेले नसेल अशी प्रत्येक व्यक्ती, तिच्याकडे किमान शालेय शिक्षणातील ७वी इयत्तेची परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र असल्याखेरीज किंवा तिने सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याप्रमाणे ७वी इयत्तेशी समतूल्य शैक्षणिक अर्हता असल्याखेरीज, सरपंच म्हणून निवडून दिली जाण्यास अर्ह असणार नाही.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मधील पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) खंड (अ) मधील, उप-खंड (दोन) मध्ये "पाच वर्षांचा" या मजकुराऐवजी "सहा वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ड) मध्ये, "पाच वर्षांचा" या मजकुराऐवजी, "सहा वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मधील पोट-कलम (२) मध्ये, "कलम ११" या मजकुरानंतर, "किंवा, यथास्थिति, कलम ३०अ-१अ", हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मधील पोट-कलम (२) मध्ये, "राज्य शासन" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी, "आयुक्त" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह, दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २९ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील पोट-कलम (२) मध्ये, "तो राजीनामा सचिवाकडे अग्रेषित करील" या मजुकराऐवजी, "तो राजीनामा सात दिवसांच्या आत सचिवाकडे अग्रेषित करील" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३० ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच, कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतींच्या संबंधात या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) प्रत्येक पंचायतीच्या अध्यक्षस्थानी सरपंच असेल.";

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (४) मध्ये "व्यक्तीसाठी व स्त्रियांसाठी पंचायतीच्या सरपंचाच्या पदांमध्ये पुढीलप्रमाणे राखीव जागा असतील" या मजकुराऐवजी, "व्यक्तींसाठी व स्त्रियांसाठी पंचायतींमध्ये सरपंचांच्या पदांचे आरक्षण हे पुढीलप्रमाणे असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ३०अ-१अ समाविष्ट करणे.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल,—

सरपंचाची थेट निवडणूक.

"**३०अ-१अ.** (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, ज्या पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका घ्यावयाच्या आहेत त्या पंचायतीच्या बाबतीत कलम ३० ची पोट-कलमे (४), (५) व (६) याच्या तरतुदींना अधीन राहून प्रत्येक पंचायतीस एक सरपंच असेल ज्याला, कलम १२ खालील ग्रामपंचायतीच्या मतदार यादीत ज्यांची नावे समाविष्ट असतील, अशा व्यक्तींनी निवडून दिलेले असेल. २०१८ चा. महा. ५४.

(२) पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबरच सरपंचाची निवडणूक घेण्यात येईल आणि पंचायतीची निवडणूक घेण्याची कार्यपद्धती, अशा निवडणुकीस योग्य त्या फेरफारांसह लागू असेल.

(३) निवडणुकीच्या वेळी कोणीही सरपंच निवडला गेला नाही तर, सरपंच निवडण्यासाठी नव्याने निवडणूक घेण्यात येईल आणि नव्याने घेतलेल्या निवडणुकीमध्येही सरपंचाची निवड झाली नाही तर, अशी रिक्त जागा, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडणुकीद्वारे भरण्यात येईल आणि या पोट-कलमान्वये निवडून दिलेल्या सरपंचाचा पदावधी हा, पंचायतीच्या सदस्यांच्या पदावधी इतका असेल.

(४) पोट-कलम (३) अन्वये निवडून आलेली कोणतीही व्यक्ती ही, या कलमान्वये निवडणुकीमध्ये यथोचितरीत्या निवडून आली असल्याचे मानण्यात येईल.

(५) सरपंचाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल, राज्य निवडणूक आयुक्ताद्वारे किंवा त्या प्रयोजनार्थ त्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याद्वारे, चिठ्ठ्या टाकून ठरविण्यात येईल.

(६) सरपंचाच्या निवडणुकीसंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास, त्याबाबतीत कलम १५ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील. ".

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३०अ मध्ये, सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३०अ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अ) ज्या पंचायतीचा सरपंच थेट निवडून दिलेला असेल त्या पंचायतीच्या संबंधात प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर घेण्यात आलेल्या पहिल्या सभेमध्ये उप सरपंचाची निवडणूक घेण्यात येईल." ;

(ख) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२अ) ज्या पंचायतीचा सरपंच थेट निवडून दिलेला असेल त्या पंचायतीच्या संबंधात, उप सरपंचाच्या बाबतीत कलम ३० च्या पोट-कलम (३) च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू असतील. ".

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मध्ये, पोट-कलम (५) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

" (६) ज्या पंचायतीचा सरपंच, या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल त्या पंचायतीच्या संबंधात या कलमाच्या तरतुदी, पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलम (१) मध्ये " सरपंच व उप सरपंच याच्या निवडणुकीसाठी " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी " उप सरपंचाच्या निवडणुकीसाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अ) या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ च्या तरतुदींनुसार सरपंचाची निवडणूक घेण्यात येईल. ".

(ग) पोट-कलम (२) मध्ये " सभेचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी आदेशाद्वारे याबाबत " या मजकुराऐवजी " सभेचे अध्यक्षस्थान सरपंच स्वीकारील, सरपंचाचे पद रिक्त असेल तर जिल्हाधिकारी आदेशाद्वारे याबाबत " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (३) मध्ये "सरपंच आणि" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ङ) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(४) उप-सरपंचाच्या निवडणुकीमध्ये समसमान मते पडल्यास सरपंचाला निर्णायक मत देण्याचा हक्क असेल आणि सरपंचाचे पद रिक्त असल्यास, त्या निवडणुकीचा निकाल, पीठासीन अधिकारी निर्धारित करील अशा रीतीने त्याच्या समक्ष चिठ्ठी टाकून देण्यात येईल. ";

(च) पोट-कलम (५) मध्ये,—

(एक) " सरपंचाच्या किंवा " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) " अशा सभेच्या अध्यक्षस्थानी असलेल्या " या मजकुरानंतर "सरपंचास किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. ".

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

"(१अ) ज्या पंचायतीचा सरपंच या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतीच्या संबंधात, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(क) पोट-कलम (१) मध्ये, ''एक-तृतीयांशापेक्षा'' या मजकुराऐवजी, ''दोन-तृतीयांशापेक्षा'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (३) मध्ये,—

" त्या त्या वेळी पंचायतीच्या कोणत्याही सभेस " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " उप-सरपंचाकडे निहित होतील " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" त्या त्या वेळी पंचायतीच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क असणाऱ्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या तीन-चतुर्थांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने जर असा अविश्वास प्रस्ताव संमत करण्यात आला असेल आणि, जिल्हाधिकाऱ्याने या प्रयोजनार्थ नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याच्या समक्ष आणि त्याच्या अध्यक्षतेखालील विशेष ग्राम सभेसमोर गुप्त मतदानाद्वारे त्या अविश्वास प्रस्तावाला संमती दिली असेल तर, सरपंच किंवा, यथास्थिति, उप-सरपंच त्या पदाच्या सर्व अधिकारांचा वापर करण्याचे व त्याची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्याचे ताबडतोब थांबवील आणि जर तो अविश्वास प्रस्ताव सरपंचाच्या विरुद्ध संमत करण्यात आला असेल तर त्यानंतर असे अधिकार, कार्ये व कर्तव्ये उप-सरपंचाकडे निहित होतील. " ;

(ग) चौथ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

" परंतु तसेच, सरपंचाच्या किंवा उप-सरपंचाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत आणि पंचायतीची मुदत समाप्त होणाऱ्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या सहा महिन्यांच्या आत असा कोणताही अविश्वासाचा प्रस्ताव आणला जाणार नाही :

परंतु तसेच, असा अविश्वासाचा प्रस्ताव निष्फळ ठरवल्यास, त्यानंतर पुढील दोन वर्षांच्या कालावधीत असा कोणताही प्रस्ताव आणला जाणार नाही. ". ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३८ ची सुधारणा.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ मधील पोट-कलम (२) मध्ये, खंड (एक) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (एक-अ) ज्या पंचायतीचा सरपंच या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिला असेल अशा पंचायतीच्या संबंधात तो सरपंच पुढील अधिकारांचा देखील वापर करील आणि पुढील कार्ये व कर्तव्ये पार पाडील,—

(अ) पंचायतीच्या सभांच्या कार्यसूचीस अंतिम रूप देणे :

परंतु, जर तीन किंवा त्यापेक्षा अधिक सदस्य, लगतनंतरच्या सभेच्या कार्यसूचीवर कोणत्याही बाबीचा समावेश करण्याची मागणी करतील तर, सरपंच ती कोणतीही बाब पुढच्या सभेच्या कार्यसूचीत समाविष्ट करील :

परंतु आणखी असे की, कोणतेही अनौपचारिक वित्तीय कामकाज हे अग्रेषित कार्यसूचीचा भाग असल्याखेरीज चालविले जाणार नाही :

परंतु तसेच, जर सरपंचाच्या मते, पंचायतीचा कोणत्याही विषयावरील ठराव हा त्या गावाच्या व्यापक हितास बाधक ठरणारा असेल तर, सरपंच, तो ठराव लगतनंतरच्या पुढील ग्रामसभेपुढे अंतिम निर्णयासाठी ठेवण्याची व्यवस्था करील आणि त्यावरील ग्रामसभेचा निर्णय अंतिम असेल ;

(ब) पंचायतीचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे ;

(क) पंचायतीशी विचारविनिमय करून, योजना राबविण्यासाठी इतर सर्व अधिकारांचा वापर करणे ; ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ च्या पोट-कलम (२) मध्ये " पाच वर्षे " या मजकुराऐवजी " सहा वर्षे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट-कलम (१) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :– सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

" परंतु आणखी असे, की या पोट-कलमान्वये रिक्त झालेले थेट निर्वाचित सरपंचाचे पद, ते रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीच्या आत, कलम ३०अ-१अ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्धारित केलेल्या रीतीने निवडणुकीद्वारे भरण्यात येईल.".

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४९ मध्ये पोट-कलम (४) मधील परंतुकामध्ये,– सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४९ ची सुधारणा.

(एक) खंड (अ) च्या आधी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :–

" (अ १) सरपंच हा तिचा पदसिद्ध अध्यक्ष असेल ; " ;

(दोन) खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :–

" (ग) ग्रामसेवक हा तिचा पदसिद्ध सदस्य-सचिव असेल. ".

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :– सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

" (१अअ) ज्या पंचायतीचा सरपंच, या अधिनियमाच्या कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतीच्या संबंधात, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :–

(क) पोट-कलमे (१) व (१अ) ऐवजी पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :–

" (१) सरपंच दरवर्षी विहित करण्यात येईल अशा नमुन्यातील विवरणाद्वारे पुढील बाबीसंबंधीच्या रकमा प्रत्येक वर्षाच्या ५ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी निर्धारित करील :–

(अ) निधीतील प्रारंभिक शिल्लक व पुढील वित्तीय वर्षासाठी पंचायतीची अंदाजित प्राप्ती ;

(ब) आस्थापनेसाठी व कलम ४५ अन्वये आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी योजलेला खर्च ;

(क) कलम १३३ अन्वये स्थापन केलेल्या जिल्हा ग्रामविकास निधीला द्यावयाची अंशदानाची रक्कम ;

(ड) खंड (अ), (ब) किंवा, यथास्थिति, (क) अन्वये तयार केलेले विवरण सरपंच पंचायतीसमोर ठेवील ;

(इ) पंचायत उक्त विवरणाबाबतच्या आपल्या शिफारशींना ३१ जानेवारी किंवा त्यापूर्वी अंतिम स्वरूप देईल ;

(फ) खंड (इ) खालील पंचायतीच्या शिफारशींसह ते विवरण ग्रामसभेपुढे तिच्या अनुसमर्थनार्थ ठेवण्यात येईल, त्यास ग्रामसभा २८ फेब्रुवारी किंवा त्यापूर्वी अनुसमर्थन देईल ;

(ग) खंड (फ) खालील ग्रामसभेच्या निर्णयानंतर, उक्त विवरण पंचायत समितीला सादर करण्यात येईल.

(१अ) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी,–

(अ) सरपंचाने विवरण सादर न केल्यास, किंवा

(ब) पंचायतीने सदर विवरणास शिफारशी न दिल्यास, किंवा

(क) ग्रामसभेने सदर शिफारशीच्या अनुसमर्थनाबाबतचा निर्णय न घेतल्यास,–

सचिव, करावयाच्या अनिवार्य व कार्यालयीन खर्चासंबंधीचे ते विवरण तयार करील, आणि ते उक्त पोट-कलमान्वये विहित केलेल्या नमुन्यात, पंचायत समितीला सादर करील." ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " पंचायत समिती " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " असा निदेश देईल. " या मजकुराने संपणाऱ्या या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल,-

" पंचायत समिती, दरवर्षी ३१ मार्च रोजी किंवा त्यापूर्वी, एकतर त्या विवरणास मान्यता देईल किंवा कलम ४५ खाली येणाऱ्या कोणत्याही कर्तव्याबाबतचा खर्च वाढविण्याचा किंवा तो कमी करण्याचा निदेश देईल. या कलमाच्या पोट-कलम (१) मध्ये निर्धारित केलेली अर्थसंकल्पीय प्रक्रिया पूर्ण करण्याच्या दिनांकापर्यंत अशा विवरणानुसार खर्च करण्यात येईल. " ;

(ग) पोट-कलम (२) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये, " पंचायत समिती असे विवरण मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, एकतर अशा विवरणास " या मजकुराऐवजी, " पंचायत समिती अशा विवरणास प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च रोजी किंवा त्यापूर्वी, आणि सुधारित व पूरक विवरणाच्या बाबतीत, ते विवरण मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, एकतर " हा मजकूर दाखल करण्यात येईल. ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ६२अ ची सुधारणा.

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२अ ला, त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२) ज्या पंचायतीचा सरपंच कलम ३०अ-१अ अन्वये थेट निवडून दिलेला असेल अशा पंचायतीच्या संबंधात, सरपंचास, ज्या वित्तीय वर्षाच्या अशा कोणत्याही विवरणास पूर्वोक्तप्रमाणे मान्यता देण्यात आली असेल त्या वित्तीय वर्षामध्ये कोणत्याही वेळी, सुधारित किंवा पूरक विवरण तयार करविता येईल. असे प्रत्येक सुधारित किंवा पूरक विवरण, जणू काही ते मूळ विवरणच होते असे समजून तशाच रीतीने, पंचायत समितीकडून विचारात घेण्यात येईल आणि त्यास मान्यता देण्यात येईल, आणि अशा सुधारित किंवा पूरक विवरणाच्या संबंधात कलम ६२ च्या तरतुदी लागू असतील. ".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४५ ची सुधारणा.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४५ मध्ये, पोट-कलम (१अ) वगळण्यात येईल.

अडचण दूर करण्याचा अधिकार.

**२२.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम याच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या उक्त अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेले कोणतेही निदेश देता येतील : १९५९ चा ३.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहामध्ये ठेवण्यात येईल.

सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृत्ती.

**२३.** (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१८ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०१८ चा महा. अध्या. २.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असेल तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम याच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल. १९५९ चा ३.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.

RNI No. MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष ४, अंक ६२] सोमवार, ऑगस्ट १३, २०१८/श्रावण २२, शके १९४० [ पृष्ठे ९, किंमत : रुपये २७.००

**असाधारण क्रमांक १२८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Village Panchayats (Amendment) Act, 2017 (Mah. Act No. LIV of 2018), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,

I/c. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. LIV OF 2018.

(*First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 13th August 2018.*)

An Act further to amend the Maharashtra Village Panchayats Act.

WHEREAS the Governor of Maharashtra had promulgated the Maharashtra Village Panchayats (Amendment) Ordinance, 2017 (hereinafter referred to as "the said Ordinance") on the 19th July 2017 ; [Mah. Ord. XVI of 2017.]

AND WHEREAS the Maharashtra Village Panchayats (Amendment) Bill, 2017 (L.A. Bill No. LVI of 2017) (hereinafter referred to as "the said Bill") for converting the said Ordinance into an Act of the State Legislature, was Introduced in the Maharashtra Legislative Assembly on the 10th August 2017 ;

AND WHEREAS as the session of the Maharashtra Legislative Assembly was prorogued on the 11th August 2017, the said Bill could not be passed by the Maharashtra Legislative Assembly ;

AND WHEREAS as provided by article 213(*2*)(*a*) of the Constitution of India, the said Ordinance would have ceased to operate on the 3rd September 2017 ;

AND WHEREAS it was considered expedient to continue the provisions of the said Ordinance and, therefore, the Maharashtra Village Panchayats (Amendment and Continuance) Ordinance, 2017 (hereinafter referred to as " the said Continuance Ordinance ") was promulgated by the Governor of Maharashtra on the 1st September 2017 ; Mah. Ord. XVIII of 2017.

AND WHEREAS upon the re-assembly of the State Legislature on the 11th December 2017, the said Bill was passed with amendment by the Maharashtra Legislative Assembly on the 19th December 2017 and transmitted to the Maharashtra Legislative Council ;

AND WHEREAS the said Bill has been passed by the Legislative Council with further amendments on the 22nd December 2017 ;

AND WHEREAS, before the amendments to the said Bill made by the Maharashtra Legislative Council, could be considered by the Maharashtra Legislative Assembly, the session of the Legislative Assembly was prorogued on the 22nd December 2017 ;

AND WHEREAS, as provided by article 213(2)(*a*) of the Constitution of India, the said Continuance Ordinance would have ceased to operate at the expiration of six weeks from re-assembly of the State Legislature, that is, after the 21st January 2018 ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature were not in session; and the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to continue the operation of the provisions of the said Continuance Ordinance, for the purposes hereinafter appearing; and, therefore, promulgated the Maharashtra Village Panchayats (Amendment and Continuance) Ordinance, 2018 (hereinafter referred to as "the said Continuance Ordinance, 2018") on the 20th January 2018 ; Mah. Ord. II of 2018.

AND WHEREAS it is expedient to replace the said Continuance Ordinance, 2018 by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixty-eighth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Village Panchayats (Amendment) Act, 2017.

*(2)* It shall be deemed to have come into force on the 19th July 2017.

Amendment of section 3 of III of 1959.

**2.** In section 3 of the Maharashtra Village Panchayats Act (hereinafter referred to as "the principal Act"),— III of 1959.

*(a)* after clause (*11AA*), the following clause shall be inserted, namely :–

"(*11 AAA*) "member" means a member duly elected as a member of *panchayat* under section 11 and include the *Sarpanch* of *panchayat* elected directly under section 30A-1A ; " ;

*(b)* in clause (*17*) after the word and figures "section 30" the figures, letters and sign " , 30A- 1A" shall be inserted.

**3.** In section 7 of the principal Act, after sub-section (*3*), the following sub-section shall be inserted, namely :— Amendment of section 7 of III of 1959.

*"(3A)* In respect of the *panchayat* to which the *Sarpanch* is elected directly under section 30A-1A, unless otherwise provided in this Act, all meetings of the *Gram Sabha* after each general election to a *panchayat,* shall be presided over by the *Sarpanch* and in his absence by the *Upa-Sarpanch*; and in absence of both *Sarpanch* and *Upa-Sarpanch,* it shall be presided over by senior most member of *panchayat* by age present in that meeting of the *Gram Sabha.* In case no member of *panchayat* is present, the said meeting of the *Gram Sabha* shall be adjourned for a period of one week, and such adjourned meeting shall be presided over by *Sarpanch* and in his absence by *Upa-Sarpanch* and in absence of both the *Sarpanch* and *Upa-Sarpanch* by the senior most member of the *panchayat* by age present in the meeting of *Gram Sabha.* In case no member of *panchayat* is present, such meeting shall be presided over by an officer authorized by the Block Development Officer in that behalf. " .

**4.** In section 10 of the principal Act, after sub-section (*1*), the following sub-section shall be inserted, namely :— Amendment of section 10 of III of 1959.

*"(1A)* In respect of the *panchayat* to which the *Sarpanch* is directly elected under section 30A-1A, the provisions of this section shall apply with the modifications that, in sub-section (*1*), in clause (*a*), before sub-clause *(i)* the following sub-clause shall be inserted, namely :—

"(*i-A*) *Sarpanch* elected under section 30A-1A- *ex officio* member ; and ".".

**5.** In section 13 of the principal Act, for sub-sections (*1*) and (*2*), the following sub-sections shall be substituted, namely :— Amendment of section 13 of III of 1959.

"(*1*) Every person whose name is in the list of voters shall, unless disqualified under this Act, or any other law for the time being in force, be qualified to vote at the election of, a member for the ward to which such list pertains and, *Sarpanch* of *panchayat* to be elected directly.

(*2*) Every person whose name is in the list of voters and who is not less than 21 years of age on the last date fixed for making nomination for every general election or bye-election shall, unless disqualified under this Act, or under any other law for the time being in force, be qualified to be elected for any ward of the village and for *Sarpanch* of *panchayat*. No person whose name is not entered in the list of voters for such village shall be qualified to be elected for any ward of the village and *Sarpanch* of *panchayat*.

(*2A*) Every person who is not less than 21 years of age on the last date fixed for making nomination for every general election or bye-election and whose name is in the list of voters and who is born on or after 1st January 1995, and who is not disqualified under this Act, or under any other law for the time being in force shall, unless possesses minimum 7th standard of school education passing certificate or acquired educational qualification equivalent to 7th standard, as certified by the competent authority, be qualified to be elected as *Sarpanch.* " .

Amendment of section 14 of III of 1959.

**6.** In section 14 of the principal Act, in sub-section (*1*),—

(*i*) in clause (*a*), in sub-clause (*ii*), for the words "five years" the words "six years" shall be substituted;

(*ii*) in clause (*d*), for the words "five years" the words "six years" shall be substituted.

Amendment of section 15 of III of 1959.

**7.** In section 15 of the principal Act, in sub-section (*2*), after the word and figure "section 11" the words, figures, letters and sign "or section 30A-1A, as the case may be" shall be added.

Amendment of section 16 of III of 1959.

**8.** In section 16 of the principal Act, in sub-section (*2*), for the words "State Government" at both the places where they occur, the word "Commissioner" shall be substituted.

Amendment of section 29 of III of 1959.

**9.** In section 29 of the principal Act, in sub-section (*2*), for the words "forward it to the Secretary" the words "forward it within seven days to the Secretary" shall be substituted.

Amendment of section 30 of III of 1959.

**10.** In section 30 of the principal Act, after sub-section (*1*), the following sub-section shall be inserted, namely :—

"(*1A*) In respect of the *panchayat* to which the *Sarpanch* is elected directly under section 30A-1A, the provisions of this section shall apply with the following modifications :—

(*a*) for sub-section (*1*), the following sub-section shall be substituted, namely :–

"(*1*) Every *panchayat* shall be presided over by a *Sarpanch.*";

(*b*) sub-section (*2*) shall be deleted ;

(*c*) in sub-section (*4*), for the words "the members belonging to" the words "persons belonging to" shall be substituted. ".

Insertion of section 30A-1A in III of 1959.

**11.** After section 30, the following section shall be inserted, namely :—

Direct election of *Sarpanch*.

"**30A-1A.** (*1*) After the date of commencement of the Maharashtra Village Panchayats (Amendment) Act, 2017 in respect of the *panchayat* to which the general election is to be held, subject to provisions of sub-sections (*4*), (*5*) and (*6*) of section 30, every *panchayat* shall have a *Sarpanch* who shall be elected by the persons whose names are included in the list of voters for village under section 12. Mah. LIV of 2018.

(*2*) Election of the *Sarpanch* shall be held simultaneously with the general elections of the *panchayat* and the procedure regarding holding of elections to the *panchayat* shall, *mutatis mutandis*, apply to such election.

(*3*) If at an election, no *Sarpanch* is elected, a fresh election shall be held to elect a *Sarpanch*, and if there is a failure to elect a *Sarpanch* at the fresh election, such vacancy may, notwithstanding anything contained in this Act, be filled by election by the elected members from amongst themselves and the term of *Sarpanch* elected under this sub-section shall be co-terminus with the term of members of the *panchayat*.

(*4*) Any person elected under sub-section (*3*) shall be deemed to be duly elected at an election under this section.

(*5*) If, in the election of the *Sarpanch*, there is an equality of votes, the result of the election shall be decided by lots to be drawn by the State Election Commissioner or the officer appointed by him for the purpose.

(*6*) In case of a dispute regarding election of the *Sarpanch*, the provisions of section 15 shall, *mutatis mutandis*, apply. ".

**12.** In section 30A of the principal Act,— Amendment of section 30A of III of 1959.

(*a*) after sub-section (*1*) the following sub-section shall be inserted, namely :–

"(*1A*) In respect of the *panchayat* to which the *Sarpanch* is directly elected, the election of the *Upa-Sarpanch* shall be held in the first meeting held after every general election. " ;

(*b*) after sub-section (*2*), the following sub-section shall be added, namely :–

"(*2A*) In respect of the *panchayat* to which the *Sarpanch* is directly elected, the provisions of sub-section (*3*) of section 30 shall, *mutatis mutandis,* apply in the case of *Upa-Sarpanch.*

**13.** In section 33 of the principal Act, after sub-section (*5*), the following sub-section shall be inserted, namely :– Amendment of section 33 of III of 1959.

"(*6*) In respect of the *panchayat* to which the *Sarpanch* is directly elected under section 30A-1A, the provisions of this section shall apply with the following modifications :—

(*a*) in sub-section (*1*), for the words "election of *Sarpanch* and *Upa- Sarpanch*" at both the places where they occurs, the words "election of *Upa-Sarpanch*" shall be substituted;

(*b*) after sub-section (*1*), the following sub-section shall be inserted, namely :—

"(*1A*) The election of the *Sarpanch* shall be held in accordance with the provisions of section 30A-1A of this Act.";

(*c*) in sub-section (*2*), after the words "presided over by" the words "the *Sarpanch* and if the post of *Sarpanch* is vacant by" shall be inserted;

(*d*) in sub-section (*3*), the words "*Sarpanch* and" shall be deleted;

(*e*) for sub-section (*4*), the following sub-section shall be substituted,–

"(*4*) If, in the election of *Upa-Sarpanch* there is an equality of votes, the *Sarpanch* shall have the right to exercise casting vote, and if the post of *Sarpanch* is vacant, the result of elections shall be decided by lot drawn in the presence of the officer presiding in such manner as he may determine.";

(*f*) in sub-section (*5*),–

(*i*) the words "*Sarpanch* or" shall be deleted;

(*ii*) after the word, brackets and figure " sub-section (*1*) " the words "*Sarpanch* or" shall be inserted.".

**14.** In section 35 of the principal Act, after sub-section (*1*), the following sub-section shall be inserted, namely :– Amendment of section 35 of III of 1959.

"(*1A*) In respect of the *panchayat* to which the *Sarpanch* is directly elected under section 30A- 1A, the provisions of this section shall apply with the following modifications:—

(*a*) in sub-section (*1*), for the words "one-third" the words "two-third" shall be substituted;

(*b*) in sub-section (*3*), for the portion beginning with the words "If the motion" and ending with the words "against the *Sarpanch*;" the following portion shall be substituted, namely :—

" If the motion of no-confidence is carried by a majority of not less than three-fourth of the total number of the members who are for the time being entitled to sit and vote at any meeting of the *panchayat*, the *Sarpanch* or the *Upa- Sarpanch*, as the case may be, and ratified before the special *Gram Sabha* by the secret ballot in the presence and under the Chairmanship of the Officer appointed for the purpose by the Collector, shall forthwith stop, exercising all the powers and, performing all the functions and duties of the office and thereupon such powers, functions and duties shall vest in the *Upa-Sarpanch*, in case the motion is carried out against the *Sarpanch* ;";

(*c*) for the fourth proviso, the following provisos shall be substituted, namely :–

"Provided also that, no such motion of no-confidence shall be brought within a period of two years from the date of election of *Sarpanch* or *Upa-Sarpanch* and before the six months preceding the date on which the term of *panchayat* expires :

Provided also that, if the no-confidence motion fails, then no motion shall be brought before the passage of time of next two years .".".

Amendment of section 38 of III of 1959.

**15.** In section 38 of the principal Act, in sub-section (*2*), after clause (*i*) the following clause shall be inserted, namely :—

"(*i-a*) in respect of the *panchayat* to which the *Sarpanch* is directly elected under section 30A-1A, the *Sarpanch* shall also exercise the following powers, functions and duties,—

(*a*) finalise the agenda of *panchayat* meetings :

Provided that, if three or more members demands regarding inclusion of any item on agenda for immediate next meeting, the *Sarpanch* shall include the same in next meeting :

Provided further that, no *ad-hoc* financial business shall be transacted unless it forms a part of the circulated agenda :

Provided also that, if the *panchayat* resolves on any subject that is detrimental to the well-being of the village at large in the opinion of *Sarpanch*, the *Sarpanch* shall cause the resolution to be kept for final decision immediately in the next following *Gram-Sabha*, and the decision of the said *Gram Sabha* shall be final ;

(*b*) prepare the annual budget of *panchayat* ;

(*c*) exercise all other powers to implement the schemes in consultation with *panchayat* ; ".

Amendment of section 39 of III of 1959.

**16.** In section 39 of the principal Act, in sub-section (*2*), for the words "five years" the words "six years" shall be substituted.

Amendment of section 43 of III of 1959.

**17.** In section 43 of the principal Act, in sub-section (*1*), after the existing proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided further that, the post of the directly elected *Sarpanch* fallen vacant under this sub-section shall be filled in by election in the manner laid down in section 30A-1A, within six months from the date of such vacancy.".

**18.** In section 49 of the principal Act, in sub-section (*4*), in proviso,— Amendment of section 49 of III of 1959.

(*i*) before clause (*a*), the following clause shall be inserted, namely :—

"(*a1*) the *Sarpanch* shall be the *ex officio* Chairman ; " ;

(*ii*) after clause (*f*), the following clause shall be inserted, namely :—

"(*g*) *Gramsevak* shall be *ex officio* Member- Secretary . " .

**19.** In section 62 of the principal Act, after sub-section (*1*), the following sub-section shall be inserted, namely :— Amendment of section 62 of III of 1959.

"(*1AA*) In respect of the *panchayat* to which the *Sarpanch* is directly elected under section 30A-1A, the provisions of this section shall apply with the following modifications :—

(*a*) for sub-sections (*1*) and (*1A*), the following sub-sections shall be sustituted, namely,—

"(*1*) The *Sarpanch* shall determine annually on or before 5th January of every year in such form as may be prescribed, a statement of,—

(*a*) the opening balance in the fund and estimated income of the *panchayat* for the following financial year ;

(*b*) the expenditure proposed on establishment and discharge of its duties under section 45 ;

(*c*) the amount to be contributed to the District Village Development Fund established under section 133 ;

(*d*) the statement made under clause (*a*), (*b*) or (*c*), as the case may be, shall be placed by the *Sarpanch*, before the *panchayat* ;

(*e*) the *panchayat* shall in respect of the said statement, finalise its recommendations on or before the 31st of January ;

(*f*) the statement along with the recommendation of the *panchayat* under clause (*e*), shall be placed before the *Gram Sabha*, which may ratify it on or before 28th of February ;

(*g*) after the decision of the *Gram Sabha* under clause (*f*), the said statement shall be submitted to the *Panchayat Samiti.*

(*1-A*) If, on or before the date specified in sub-section (*1*),–

(*a*) the *Sarpanch* fails to submit the statement ; or

(*b*) the *panchayat* fails to make recommendation in respect of the statement ; or

(*c*) the *Gram Sabha* fails to take decision in respect of ratification of the recommendations,

the Secretary shall prepare the statement, regarding the mandatory and office expenditure to be carried out and submit it to the *Panchayat Samiti* in the form prescribed under the said sub-section.";

(*b*) in sub-section (*2*), for the portion beginning with words " The Panchayat Samiti " and ending with words " increased or decreased: " the portion " The *Panchayat Samiti* shall, either approve the statement or direct that the proposed expenditure on

any of the duties falling under section 45 shall be increased or decreased on or before 31st March of the every year. Expenditure shall be carried out as per this statement till the date budgetary process outlined in sub-section (*1*) of this section is completed:" shall be substituted ;

(*c*) in second proviso of sub-section (*2*), after the words " be increased or decreased" the words and figure " on or before 31st March of every year and in case of revised and supplementary statement " shall be inserted. ".

Amendment of section 62A of III of 1959.

**20.** Section 62A of the principal Act, shall be re-numbered as sub-section (*1*) of that section and after sub-section (*1*) as so re-numbered, the following sub-section shall be added, namely :—

"(*2*) In respect of the *panchayat* to which the *Sarpanch* is directly elected under section 30A-1A, a *Sarpanch* may at anytime during the financial year for which any such statement has been approved as aforesaid cause a revised or supplementary statement to be prepared. Every such revised or supplementary statement shall be considered and approved by the *Panchayat Samiti* in the same manner as if it were an original statement, and the provisions of section 62 shall apply in relation to such revised or supplementary statement. ".

Amendment of section 145 of III of 1959.

**21.** In section 145 of the principal Act, sub-section (*1 A*) shall be deleted.

Power to remove difficulty.

**22.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of the Maharashtra Village Panchayats Act, as amended by this Act, the State Government may, by an order published in the *Official Gazette,* as the occasion arises, make such provisions not inconsistent with provisions of the said Act, as amended by this Act, as may appear it to be necessary or expedient for purpose of removing the difficulty : III of 1959.

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of this Act.

(*2*) Every order made under sub-section (*1*) shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

Mah. Ord. II of 2018. **23.** (*1*) The Maharashtra Village Panchayats (Amendment and Continuance) Ordinance, 2018, is hereby repealed. Repeal of Mah. Ord. II of 2018 and saving.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the corresponding provisions of the Maharashtra Village Panchayats Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the said Act, as amended by this Act. III of 1959.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.